VOL- XII ISSUE- II FEBRUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# नांदेड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आर्थिक व सामाजिक घटकाचा, त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम-एक अभ्यास

**स्मिता रामलू लखमावाड**
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

**प्रा. डॉ. गिणगिने अशोक पांडुरंगराव**
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावना:**

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे.

शिक्षण हे आजच्या सध्याच्या परिस्थितीमध्ये खूप गरजेचे झाले आहे. शिक्षण मिळणे हा प्रत्येकाचा प्रत्येक व्यक्तिचा मूलभूत अधिकार आहे. शिक्षण ही आज परिस्थितीत व्यक्तीची चौथी महत्वाची गरज बनली आहे. व्यक्ति अशिक्षित असेल तर त्याचे खूप मोठे नुकसान होते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांनी देखील शिक्षणाचे महत्व पटवून दिले. आंबेडकर यांच्या सुविचारानुसार शिक्षणामुळे मानवाची प्रगती होण्यास मदत होते. म्हणूनच शिक्षण शिकल्यामुळे अन्यायाविरुद्ध आपल्याला बोलण्याची ताकद निर्माण होते म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी शिक्षणास वाघिनीचे दूध असे म्हटले आहे.

भारत हा अत्यंत प्राचीन अशी संस्कृती लाभलेला देश आहे. भारताला पाच हजार वर्षाचा इतिहास आहे शिक्षणाची सुरुवात वैदिक काळापासून सुरू झाली पण या काळामध्ये शिक्षण घेणारे हे मोजकेच होते.

भारतामध्ये शिक्षणाची खरी सुरुवात ही ब्रिटिशांच्या राजवटीत सुरू झाली ब्रिटिश राजवटीत मिशनरी लोकांनी आदिवासी समाजाला शिक्षण देण्याचे प्रयत्न केले ब्रिटिशांनी आपली सत्ता सांभाळण्यासाठी कारकून वर्गाची आवश्यकता होती व त्यासाठी त्यांनी त्या स्वरूपाचे शिक्षण देण्यास सुरुवात केली.

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाईनी मुलींची पहिली शाळा 1948 साली पुणे येथे काढली काही वर्षांनी 1953 अति मागास व आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी देशातील पहिली शाळा पुण्यात काढली खऱ्या अर्थाने आदिवासींच्या परिवर्तनाला इथूनच सुरुवात होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या शिक्षणावर खऱ्या अर्थाने भर देण्यात आला. अनुसूचित जमातींच्या शिक्षणाला महाराष्ट्रात एक में 1920 नंतर घरी स्वरूपाची सुरुवात साली याच काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी विकासासाठी प्रयत्न केले शासनातर्फे स्वतंत्र आदिवासी विकास मंत्रालय विभाग अस्तित्वात आला आहे.

ब्रिटिश काळापासून ते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक योजना सुरु करूनही आदिवासी समाजातील शिक्षणाचे प्रमाण खूपच अल्प आहे. याचे मुख्य कारण हे आहे की, हा समाज दऱ्याखोऱ्यात राहत असून त्यांना या योजनांचा मानवतासा फायदा झालेला नाही. त्यामुळे त्यांचे शिक्षणातील प्रमाण कमी राहिले. त्यातच त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणी व समस्यांना समोर जावे लागते.

म्हणूनच प्रस्तुत संशोधनात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेताना कोण कोणत्या अडचणी व समस्या येतात याचा अभ्यास करण्याचा प्रामाणिक हेतुने हे संशोधन हाती घेण्यात आले आहे.

**संशोधन समस्या विधान**

"नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील उच्चमाध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक, आरोग्य, आर्थिक व सामाजिक घटकांचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम - एक अभ्यास".

**संशोधनाची उद्दिष्टे**

1.नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करणे

2.नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा व घटकांचा अभ्यास करणे.
3.नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
4.नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य' आर्थिक परिस्थिती व सामाजिक घटक यांचा त्यांच्या अध्यायन संपादणुकीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची परिकल्पना**

1.आदिवासी विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वातावरण शिक्षणास पोषक नाही.
2.आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम होतो.
3.आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदासीनतेचा आहे.
५.आदिवासी समाजातील अज्ञान रूढी परंपरांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो.

**जनसंख्या व न्यादर्श**

शैक्षणिक समस्यांच्या अभ्यासात संपूर्ण जनसंख्या दृष्टिसमोर असली तरी तिचा अभ्यास करणे शक्य नसते. संपूर्ण जनसंख्येचे प्रतिनिधित्व करू शकणाऱ्या एका लहान गटाच्या अभ्यासावरून संपूर्ण जनसंख्येच्या प्रवृत्ती बाबत पूर्वानुमान काढणे अधिक श्रेयस्कर असते जनसंख्येत सर्व घटकांचा अंतर्भाव असतो.

**न्यादर्शीचे प्रकार**

**A) संभाव्यतेवर आधारित न्यादर्श**

**B) असंभाव्यतेवर आधारित' न्यादर्श**

संभाव्य पध्दतीमूळे न्यादर्षाचे निपक्षपाती निवड करता येते. सोय व बचत हे दोन फायदे होतात.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केला.

**न्यादर्श पध्दती -**

शैक्षणिक संशोधनात न्यादर्श हा घटक मूलभूत आहे. शैक्षणिक समस्यांच्या अभ्यासात संपूर्ण जनसंख्या दृष्टिसमोर असली तरी तिचा अभ्यास करणे शक्य नसते. जनसंख्येच्या तथ्य विषयी पूर्ण अनुमान करण्याकरिता जनसंख्या निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान संचास न्यादर्श असे म्हणतात.

न्यादर्श संपूर्ण जनसंख्याचा एक भाग असतो. न्यादर्श संपूर्ण जनसंख्याचे प्रतिनिधित्व करतात. न्यादर्श अभ्यासावरून संपूर्ण जनसंख्येच्या प्रवृत्तीबाबत पूर्व अनुभव काढले जातात म्हणून योग्य व संपर्क न्यादर्शाची निवड हे संशोधनातील महत्वाचे कार्य ठरते.

जनसंख्येच्या विशेषणांचे प्रतिनिधित्व करणे आयुष्याची निवड करून निदर्शकजन्सी करता येते. जनसंख्या मोठी असल्यास त्याचा अभ्यास करणे सोयीस्कर होण्यासाठी जनसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गटावर संशोधन करून ती पूर्ण गटावर लागू करता येते.

न्यादर्श याचा ढोबळ मानाने संपूर्ण जनसंख्या चे प्रतिनिधित्व करणारा लहान गट असा अर्थ होत असला तरी काही शास्त्रीय व्याख्या आहेत.

**संशोधनाची कार्यवाही**

संशोधनाचा प्रमुख हेतू नवे ज्ञान प्राप्त करणे विदयमान तथ्यांबद्दल दृष्टिकोन प्रस्तुत करणे, नवीन ज्ञानावर प्रकाश टाकणे, प्रचलित चुकांना दूर करून त्या दुरुस्ती करणे आणि नवीन अध्ययना करता नवीन ज्ञानाचा शोध घेणे तसेच शास्त्रीय पध्दतीने संशोधन हे उपयोजन आहे.

संशोधन करताना विविध पद्धतीच्या आधारे संशोधन कार्य करावे लागते. या संशोधनात शैक्षणिक संशोधनाच्या ऐतिहासिक पद्धती, प्रायोगिक पध्दती आणि सर्वेक्षण पध्दतींचा उपयोग करण्यात आला.

सर्वेक्षणामधुन 3 प्रकारची माहिती संकलित केली गेली वर्तमान स्थिती, अपेक्षित स्थिती, आवश्यक साधनांचा शोध तसेच शालेय सर्वेक्षण, लोकमत सर्वेक्षण आणि सामाजिक सर्वेक्षण या सर्वेक्षण पध्दतींच्या प्रकारांचा उपयोग केला.

यामध्ये संभाव्यतेवर आधारित आणि असंभाव्यतेवर आधारित न्यादर्शाचा उपयोग केला

निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखती, अभिवृत्तीमापिका, शोधिका, पडताळा सूची, पदनिश्वयन श्रेणी, अंक पत्र, प्रमाणित चाचण्या, समाजमिती तंत्र, प्रक्षेपण तंत्र यामधून संशोधकाने प्रस्तुन संशोधनासाठी प्रमाणित चाचणी या साधनाची मदत घेतली

प्रमाणित चाचणीत व्यापकता, वैधता, वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता, व्यवहार्यता, प्रमाणक विभेदकारिता हि वैशिष्ट्ये ठेवून चाचणी तयार केली.

संशोधकाने संशोधनात **Mental health ability** या चाचणीचा उपयोग घेतला. ही चाचणी **डॉ. अरून कुमार सिंघ (पटना), डॉ. कल्पना सेनगुप्ता** यांनी तयार केली असून यामध्ये 130 विधाने आहेत त्याद्वारा विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य मापन केले.

Socio-Economic Status Scale ही अन्य चाचणीचा संशोधनात use केला असून ही scale डॉ. राजीव लोचन भारद्वाज यांनी तयार केली. ही चाचणी विद्यार्थ्यांचे आर्थिक व सामाजिक घटकाबद्दल माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरते.

यामध्ये न्यादर्श पद्धतीचा उपयोग केला. विदयार्थ्यांच्या मानसिक तानाचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील इयत्ता अकरावी वर्गाच्या विदयार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करण्यासाठ ि श्री. संत गाडगेबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा येथील 100 विदयार्थ्यांपैकी ५० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**प्रत्यक्ष कार्यपद्धती**

सर्वप्रथम आदिवासी विदयार्थ्यांच्या मानसिक, आरोग्य, आर्थिक, सामाजिक घटक याविषयी संशोधन समस्या निवडण्यात आली. त्यानंतर तिची पार्श्वभूमी तिच्याशी संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा घेऊन समस्येचे स्वरूप निश्चित करण्यात आले.

त्यानंतर समस्येचे उदिष्टे व परिकल्पना ठरवली गेली. हे सर्व कार्य मार्गदर्शकाच्या सूचनाप्रमाणे करण्यात आले, नंतर संशोधकांची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली.

सर्वप्रथम नांदेड जिल्हा कार्यक्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक महाविद्यालयाचा शोध घेण्यात आला. चौकशी अंत्य श्री. संत गाडगेबाबा आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची माहिती मिळाली अंदाजे हे महाविद्यालय नांदेड जिल्हयापासून कमी जास्त प्रमाणात 30 Km ते 35 km अंतरावर येत.

महाविद्यालयास भेट देण्याअगोदर अदिवासी समुदायाचा व विदयार्थ्यांची माहिती करून घेऊन त्यांच्यांच्यासाठी मानसिक, आरोग्य, सामाजिक व आर्थिक घटकाचा विचार करून दोन प्रकारच्या प्रश्नावली संच तथार करण्यात आले.

1. **मानसिक आरोग्य क्षमता**

2) **Socio- Economic Status Scale.**

यानंतर संशोधक ज्या संकुलाचे प्रशिक्षणार्थी आहेत त्या प्राचार्याचे अनुमती पत्र घेण्यात आले होते पत्र हे महविद्यालयाच्या कार्यालयात देण्यात आले, महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाची चर्चा करून व त्यांची परवानगी घेऊन इथल्य ा अकरावीच्या विदयार्थ्यांना प्रश्नावली सोडवण्यासाठी देण्यात आली. प्रश्नावली सोडवण्यासंदर्भात तर त्यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नावली सोडवणे स्वीकार झाले आवश्यकतेप्रमाणे संशोधकाने देखील प्रश्नावलीतील प्रश्न समजावून सांगण्यास विद्यार्थ्यांना मदत केली. सर्व विदयार्थ्यांना सर्वप्रथम Mental Health Ability ही चाचणी देण्यात आली व ती पण अर्ध्या तासांमध्ये विद्यार्थ्यांनी सोडवून परत दिली. चाचणी सोडवत असताना शाळेतील प्राध्यापक श्री. देशमुख सर हे वर्गात हजर होते तसेच स्वतः संशोधिका वर्गामध्ये हजर होत्या व प्रश्नावली सोडवून घेतली.

विद्यार्थी व विद्यार्थिनींशी गप्पा मारून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले व त्यांना आरोग्यविषयक माहिती देण्यात आली.

**माहिती विश्लेषण**

**टेबल नं.१**

उच्च माध्यमिक विदयार्थीच्या स्वायत्तता व सामाजिक घटक विषयक स्थिती

| प्रतिसाद | मध्यमान | प्रमाणविचलन | t | t प्राप्त मूल्यांक |
|---|---|---|---|---|
| N1 = 50 | M1 =10.55 | 61 = 1.51 | 1.41 | 0.05 = 2.02 |
| N2 = 50 | M2 =2.20 | 62 = 1.09 | | |

**निरीक्षण :-**

स्वायत्तता चाचणीचे मध्यमान ( M_{1} = 10.55 ) असून सामाजिक घटक विषयक चाचणीचे माध्यमान (MR = 27.35) आहे. स्वायत्तता चाचणीचे प्रमाणविचालंन (sigma_{1} = 1.51) असून सामाजिक घटक चाचणीचे

प्रमाण विचलन (sigma_{2} = 6.09) आहे. : मूल्य = (2.45) आहे. । टेबल मूल्यांक = (0.05 = 2.02) आहे. । प्राप्त मूल्य हे, । टेबल मूल्य पेक्षा जास्त आहे म्हणून संशोधक (H०) हे शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधकीय परीकल्पनेचा स्वीकार करतात.

**निष्कर्ष** :-उच्च माध्यमिक विदयार्थीच्या स्वायत्तता स्थितीवर सामाजिक घटक स्थितीचा धनात्मक परिणाम होताना दिसून आला.

**टेबल नं.२**

उच्च माध्यमिक विदयार्थीच्या स्वायत्तता व शैक्षणिक घटक विषयक स्थिती.

| प्रतिसाद | मध्यमान | प्रमाणविचलन | t | t प्राप्त मुल्यांक |
|---|---|---|---|---|
| N1 = 50 | M1 = 10.55 | 61 = 1.51 | 1.41 | 0.05 = 2.02 |
| N2 = 50 | M2 = 2.20 | 62 = 1.09 | | |

**निरीक्षण :-**

स्वायत्तता चाचणीचे मध्यमान (M_{1} = 10.55) असून शैक्षणिक घटक विषयक चावणीचे माध्यमान (MR = 2.2) आहे. स्वायत्तता चाचणीचे प्रमाणविचालन sigma_{1} = 1.51 ) असून शैक्षणिक घटक चाचणीचे प्रमाण विचलन (sigma_{2} - 1.09) आहे. प्राप्त F * C ^ 4 = (1.41) आहे. । टेबल मूल्यांक = (0.05 = 2.02) आहे. प्राप्त मूल्य है, । टेबल मूल्य पेक्षा कमी आहे म्हणून संशोधक (H०) हे शून्य परिकल्पनेचा स्वीकार करतात.

**निष्कर्ष** :- उच्च माध्यमिक विदयार्थीच्या स्वायत्तता स्थितीवर शैक्षणिक घटक स्थितीचा ऋणात्मक परिणाम होताना दिसून आला.

**टेबल नं.३**

उच्चं माध्यमिक विद्यार्थीच्या स्वायत्तता व वार्षिक उत्पन्न विषयक स्थिती

| प्रतिसाद | मध्यमान | प्रमाणविचलन | t | t प्राप्त मूल्यांक |
|---|---|---|---|---|
| N1 = 50 | M1 = 10.55 | 61 = 1.51 | 5.49 | 0.05 = 2.02 |
| N2 = 50 % | M2 = 1.32 | 62 = 0.98 | | |

**निरीक्षण :-**

स्वायत्तता चाचणीचे मध्यमान ( M_{1} = 10.55 असून वार्षिक उत्पन्न विषयक चाचणीचे माध्यमान (MR = 1.32) आहे. स्वायत्तता चाचणीचे प्रमाणविचालंन (sigma_{1} = 1.51) असून वार्षिक उत्पन्न चाचणीचे प्रमाण विचलन sigma_{2} - 0.98 ) आहे. । प्राप्त मूल्य = ( 5.49 ) आहे. + टेबल मूल्यांक = (0.05 = 2.02) आहे. । प्राप्त मूल्य हे,। टेबल मूल्य पेक्षा जास्त आहे म्हणून संशोधक (H०) हे शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधकीय परी कल्पनेचा स्वीकार करतात.

**निष्कर्ष** :-

उच्च माध्यमिक विदद्यार्थीच्या स्वायत्तता स्थितीवर वार्षिक उत्पन्न स्थितीचा धनात्मक परिणाम होताना दिसून आला.

ठेवल्याशिवाय संशोधन पूर्णत्वास येऊ शकत नाही म्हणजेच निष्कर्ष हा संशोधनातील महत्वाचा पैलू समजला जातो.

**संशोधन निष्कर्ष:**

१। विदयार्थ्यांच्या भावनिकतेवर समाज घटकाचा परिणाम होताना दिसून आला.

२) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या भावनिकतेवर कौटुंबिक घटकाचा परिणाम होताना दिसून आला.

३) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकावर शैक्षणिक परिस्थितीचा परिणाम दिसून आला.

४) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकावर व्यावसायिक स्थितीचा परिणाम दिसून आला.

५) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकावर जात विषय घटकाचा परिणाम होताना दिसून आला.

६) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकावर वार्षिक उत्पन्नाचा परिणाम होताना दिसून आला तर मासिक उत्पन्नाचा परिणाम दिसून आला नाही.

७) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडजोड या घटकावर सामाजिक परिस्थितीचा परिणाम दिसून येत नाही.

८) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडजोड या घटकावर कौटुंबिक घटकाचा परिणाम झाला नाही.

९) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडजोडीवर शैक्षणिक घटकाचा परिणाम दिसून आला नाही.

१०) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडजोड या घटकावर व्यवसाय घटकाचा परिणाम जास्त होताना दिसून आला नाही.

११) उच्चमाध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडजोड या घटकावर जात विषयक घटकाचा परिणाम होताना दिसून येतो.

१२) उच्च माध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तडतोडी या घटकावर वार्षिक उत्पन्नाचा परिणाम होतो तर मासिक उत्पनाचा परिणाम तेवढा होत नाही.

**संदर्भग्रंथ**


1. देशमुख, व्ही. (2018). शिक्षण शास्त्र: सिद्धांत वा व्यवहार [शैक्षणिक सिद्धांत आणि पद्धती]. पुणे: शैक्षणिक प्रकाशन.
2. Joshi, S. (2020). Manasik Swasthya ani Vidyarthi Vikas [Mental health and student development]. Mumbai: Academic Press.
3. कदम, एस. (2019). ग्रामीण शिक्षण पध्दती [ग्रामीण शिक्षण प्रणाली]. कोल्हापूर : शिक्षण प्रकाशन.
4. Patil, R. (2017). Aarogya Shikshan va Janjagruti [Health education and awareness]. Nashik: Health Publications.
5. सराफ, जी. (2016). समाजशास्त्राचा परिचय [समाजशास्त्राचा परिचय]. नागपूर: समाजशास्त्र प्रकाशन.
6. टाकसाळे, आर. (2015). शैक्षणिक मानसशास्त्र [शैक्षणिक मानसशास्त्र]. औरंगाबाद : सायकॉलॉजी पब्लिशर्स.
7. Tupe, A. (2018). Aadivasi Vikas va Shikshan [Tribal development and education]. Nanded: Tribal Research Center.
8. वर्मा, आर. सी. (2021). भारतातील आदिवासी समाजाचा इतिहास आणि संस्कृती. दिल्ली: आदिवासी अभ्यास प्रकाशन.
9. बर्वे, ए. (2022). शैक्षणिक धोरणे आणि आदिवासी विकास. मुंबई: पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट.
10. कापसे, एस. (2020). शैक्षणिक संस्थातील सामाजिक प्रभाव [सामाजिक प्रभाव संस्था]. शैक्षणिक सामाजिक विज्ञान